कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावत असताना कोरोना विषाणूचा संसर्ग होऊन मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याबाबत.
कै.(श्री.) प्रमोद रामकृष्ण कोकाटे, सह शिक्षक

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : लोआप्र-२०२६/प्र.क्र.१२/ E-१५८५२८८/ टीएनटी-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनांक: २५ ऑगस्ट २०२६

संदर्भ :-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दिनांक २९.०५.२०२०, दिनांक. १४.१०.२०२० व दिनांक १४.०५.२०२१
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे क्रमांक: सहाय्य-२०२०/प्र.क्र.८१/टीएनटी-६, दिनांक ०७.१२.२०२० व दिनांक १६.०३.२०२१ चे पत्र.
३) जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अकोला यांचे पत्र क्र.कावि-२५९/२०२६ दि.१५/०५/२०२६
४) शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र क्र.प्राशिसं/८०३/ संकीर्ण/कोविड/प्रमोद कोकाटे/२०२६, दिनांक ११/०५/२०२६
५) मा.लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त कार्यालय,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.लोआ/कॉम/१४९२/२०२३ (टे-४) दिनांक २८/०३/२०२५
६) मा.लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त कार्यालय,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.लोआ/कॉम/१४९२/२०२३ (टे-४)/८८८२/२०२६ दिनांक ११/०५/२०२६

ज्ञापन :-

कै.(श्री.) प्रमोद रामकृष्ण कोकाटे, सह शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, तांदुळवाडी ता. अकोट जि. अकोला यांचा कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हिड-१९ मुळे दिनांक ०९/०६/२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे.

२. कै. (श्री.) कोकाटे, यांच्या वारसास वित्त विभागाच्या संदर्भ क्र. (१) येथील दिनांक २९.०५.२०२० च्या शासन निर्णयानुसार रु.५०.०० लक्ष रकमेचे सानुग्रह सहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव मा.लोकायुक्त यांचे सुनावणीतील आदेश विचारात घेऊन पुढील कार्यवाहीस्तव शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी संदर्भ क्र. (४) येथील पत्रान्वये सादर केला आहे.

३. संदर्भ क्र.५ अन्वये प्रस्तुत प्रकरणी मा.लोकायुक्त यांनी दि. २०/०२/२०२५ रोजी शिफारस केली आहे. तसेच मा. लोकायुक्त यांच्या शिफारशीनंतर जिल्हाधिकारी अकोला यांनी सुनावणीअंती २) कै.(श्री.) कोकाटे यांची गृह विलगीकरण परवानगी कक्ष येथे नियुक्त करण्यात आली होती, त्यामुळे कोव्हिड संक्रमित झाले आहेत, ३) तसेच चाचणीमध्ये सुध्दा ते कोव्हीड पॉसिटीव्ह असल्याचे निर्दशनास आले असून त्यामुळे ते दिनाक ०९/०६/२०२१ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. असे निष्कर्ष नोंदविले आहेत.

४. कै. (श्री.) कोकाटे यांच्या वारसास वित्त विभागाच्या दि.२९/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये रु. ५० लक्ष रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात कवच मिळावे असा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांनी सादर केला आहे.

५.	कै.(श्री.) प्रमोद रामकृष्ण कोकाटे, सह शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, तांदुळवाडी ता. अकोट जि. अकोला येथे कार्यरत होते.

६.	गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोट यांचे दिनांक ३०/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार कै.(श्री.) कोकाटे यांची गृह विलगीकरणाबाबतचे नियुक्ती आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार कै.(श्री).कोकाटे हे दिनांक १५/०५/२०२१ ते दिनांक ३१/०५/२०२१ पासून अकोट ग्रामीण भागातील कोरोना बाधित रुग्णांचे Contact Tracing अंतर्गत नियुक्ती पथकात गट विकास अधिकारी यांचे सहायक म्हणून कार्यरत असल्याबाबत गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित केले आहे.

७.	कै.(श्री.) कोकाटे यांची दि.०५/०६/२०२१ रोजी केलेली कोव्हिड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली असल्याचे दिसून येते.

८.	गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोट यांचे दिनांक ३०/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार कै.(श्री.) कोकाटे यांची गृह विलगीकरणाबाबतचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आल्याचे दिसून येते. त्यानुसार कै.(श्री).कोकाटे हे दिनांक १५/०५/२०२१ ते दिनांक ३१/०५/२०२१ पासून अकोट ग्रामीण भागातील कोरोना बाधित रुग्णांचे Contact Tracing अंतर्गत नियुक्ती पथकात गट विकास अधिकारी यांचे सहायक म्हणून कार्यरत असल्याबाबत गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित केले आहे. परंतु इस्पितळात दाखल होण्याच्या अथवा मृत्यूच्या दिनांकापूर्वी १४ दिवसांच्या काळात कर्तव्यावर हजर होते ही बाब जिल्हाधिकारी अथवा अन्य कोणताही पदनिर्देशित विभाग प्रमुख इत्यादी यांचेकडून सत्यापित प्रमाणित प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही, तथापि, संदर्भ क्र.५ अन्वये प्रस्तुत प्रकरणी मा.लोकायुक्त यांनी दि. २०/०२/२०२५ रोजी शिफारस केली आहे. तसेच मा. लोकायुक्त यांच्या शिफारशीनंतर जिल्हाधिकारी अकोला यांनी सुनावणीअंती २) कै.(श्री.) कोकाटे यांची गृह विलगीकरण परवानगी कक्ष येथे नियुक्त करण्यात आली होती, त्यामुळे कोव्हिड संक्रमित झाले आहेत, ३) तसेच चाचणीमध्ये सुध्दा ते कोव्हीड पॉसिटीव्ह असल्याचे निर्दशनास आले असून त्यामुळे ते दिनाक ०९/०६/२०२१ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. असे निष्कर्ष नोंदविले आहेत.

९.	कै.(श्री.) कोकाटे यांचेवर दिनांक ०४/०६/२०२१ पासून ते दिनांक ०९/०६/२०२१ या कालावधीत ॲक्सान हॉस्पीटल, अमरावती येथे कोव्हिड-१९ उपचार करण्यात आले. दिनांक ९/०६/२०२१ रोजी कोव्हिड-१९ आजाराने मृत्यु झाल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र फॉर्म क्र. ४ द्वारे वैद्यकीय अधिक्षक, ॲक्सान हॉस्पीटल, अमरावती यांनी प्रमाणित केले आहे.

१०.	कै.(श्री.) कोकाटे यांचा दिनांक ०९/०६/२०२१ रोजी मृत्यु झाल्याबाबतचे मृत्यु प्रमाणपत्र निबंधक (जन्म व मृत्यु), महानगरपालिका, अमरावती यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे.

११.	मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अकोट यांनी कै. (श्री.) कोकाटे यांचे कायदेशिर वारस म्हणून (१) श्रीमती सुमनबाई रामकृष्ण कोकाटे (२) श्रीमती शितल प्रमोद कोकाटे (३) संस्कृती प्रमोदराव कोकाटे (४) यथार्थ प्रमोद कोकाटे यांना घोषित केले आहे.

१२.	कै.(श्री.) प्रमोद रामकृष्ण कोकाटे, सह शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, तांदुळवाडी ता. अकोट जि. अकोला यांना २२०२ ०१७३-३६ सहायक अनुदान (वेतन) या लेखशिर्षातून मासिक वेतन अदा करण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अकोला यांनी प्रमाणित केले आहे.

१३. जिल्हाधिकारी,अकोला यांच्या सुनावणीतील आदेश व वैद्यकीय अधिक्षक, ॲक्सान हॉस्पीटल, अमरावती यांनी प्रमाणित केल्यानुसार तसेच, मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अकोट यांनी कै. (श्री.) कोकाटे यांचे कायदेशिर वारस म्हणून (१) श्रीमती सुमनबाई रामकृष्ण कोकाटे (२) श्रीमती शितल प्रमोद कोकाटे (३) संस्कृती प्रमोदराव कोकाटे (४) यथार्थ प्रमोद कोकाटे यांना एकत्रित रु.५० लक्ष (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात विमा कवच /सानुग्रह सहाय्य प्रदान करण्यास वित्त विभागाच्या दिनांक २९/०५/२०२० च्या शासन निर्णयानुसार याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

१४. प्रस्तुत प्रस्तावावरील खर्च वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार अनौपचारिक संदर्भ क्र.४९०/व्यय-५ दि.०६/०८/२०२६ अन्वये खाली नमूद लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

"मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, (०१) प्राथमिक शिक्षण, १९६, जिल्हा परिषदांना सहाय्य, (०१) प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा परिषदांना सहाय्य, (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने, (२२०२ ०१७३)/३१-सहायक अनुदान-वेतनेतर."

१५. सदर निधी वितरित करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी संबंधितांना प्रत्यक्ष प्रदान झाल्याबाबतची माहिती प्रमाणीकरणासह सादर करावी.

१६. सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०८२५१६५९०३३१४९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by GOVIND BALU KAMBLE
Date: 2026.08.25 17:00:43 +05'30'

(गोविंद कांबळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता :-

१. कक्ष अधिकारी, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती
५. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला
६. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (प्राथमिक), अकोला

प्रत माहितीसाठी :-

१. वित्त विभाग (व्यय-९)/(व्यय-५), मंत्रालय, मुंबई
२. कक्ष अधिकारी/अवर सचिव (एस एम ४)/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. श्रीमती शितल प्रमोद कोकाटे अकोट जि. अकोला पीन-४४४१०१
४. निवड नस्ती (टीएनटी-६) (प्र.क्र.१२/२०२६) E-१५८५२८८